## आदेश नि. क्र. १ खाली एम. जे. सी. क्र. १२८८ / २०२५
## दिनांक : ०७/०५/२०२६

प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम ८ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केले आहे.

२. अर्जातील तथ्ये खालीलप्रमाणे :

अर्जदाराची मोठी आई नामे मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांचा मृत्यू **दि. ३०/१२/२००३** रोजी वाईखुर्द, ता. वरूड, जि. अमरावती येथे झाला आहे. तसेच मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांचे पती महादेव फुसे यांचा पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झाला आहे. मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांना कोणतेही अपत्य नव्हते. तसेच अर्जदाराचे वडील नामाजी सुभाण्या फुसे व आई मथुरा नामाजी फुसे यांचा देखील पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झाला आहे. अर्जदाराचे आई – वडिलांना अर्जदार हे एकमेव अपत्य आहे. अशाप्रकारे मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांना अर्जदार हे एकमेव वारस असून या शिवाय अन्य कुणीही वारस नाही. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी विद्यमान दिवाणी न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी सदरचा अर्ज विद्यमान न्यायालयात दाखल केला आहे.

३. सदरच्या अर्जावर हरकत नोंदविण्याकरिता स्थानिक दैनिक वृत्तपत्र **दैनिक वरूड दर्पण** मध्ये जाहीर प्रसिद्धी दिनांक **२९/०१/२०२६** रोजी **नि. क्र. १३** अन्वये करण्यात आली. परंतु, त्यावर आजतागायत कोणीही हरकत नोंदविली नाही.

४. अर्जदारातर्फे वकील **जी. एस. घोरपडे** यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांची पडताळणी केली.

५. अर्जाच्या अनुषंगाने अर्जदाराने **नि. क्र. ०९** अन्वये स्वत:चे पुरावा शपथपत्र दाखल करून पुरावा नोंदविला. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांची मोठी आई नामे मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांचा मृत्यू **दि. ३०/१२/२००३** रोजी वाईखुर्द, ता. वरूड, जि. अमरावती येथे झाला आहे. तसेच मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांचे पती महादेव फुसे यांचा पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झाला आहे. मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांना कोणतेही अपत्य नव्हते. तसेच त्यांचे वडील नामाजी सुभाण्या फुसे व आई मथुरा नामाजी फुसे यांचा देखील पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झाला आहे. त्यांच्या आई – वडिलांना ते एकमेव अपत्य आहे. त्यामुळे मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांना ते एकमेव वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कुणीही वारस नाही. त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी विद्यमान दिवाणी न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज विद्यमान न्यायालयात दाखल केला आहे.

६. अभिलेखावरील दस्तऐवज **नि. क्र. १० ते १४** ची पडताळणी केली असता असे दिसून आले की, **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांचा मृत्यू **दि. ३०/१२/२००३** रोजी झाला आहे. अभिलेखावरील उपलब्ध मौखिक व लेखी पुराव्याचे अवलोकन केले. तसेच अर्जावर कोणतीही हरकत नोंदविण्यात न आल्यामुळे अर्जदाराच्या कथनावर अविश्वास करता येणार नाही आणि त्यावरून अर्जदार हे मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांचे औपचारिक वारस असल्याचे निष्कर्ष नोंदवित आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये अर्जदाराला मयताचे वारस घोषीत करून वारस प्रमाणपत्र बहाल करणे न्यायोचीत राहील. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये अर्जदार नामे बाबुराव नामाजी फुसे हे मयत **चंद्रभागा महादेव फुसे (देशभ्रतार)** यांचे औपचारिक वारस असल्याचे प्रमाणपत्र कायदेशीर मुद्रांक शुल्काचा भरणा केल्यावर प्रदान करण्यात यावे.

३. सदर प्रमाणपत्रावर दिवाणी नियमावली परिच्छेद क्रमांक ३१२ मधील टीप नोंदवावी.

४. सदरहू अर्जदार यांना नियमानुसार कोर्ट फी भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

५. सदरहू वारस प्रमाणपत्र हे अर्जदार यांना फक्त शासकीय व निमशासकीय कामांकरिता देण्यात येत आहे.

६. प्रकरण निकाली काढण्यात आले.

JAYA SURESHRAO THAKARE

Digitally signed by JAYA SURESHRAO THAKARE
Date: 2026.05.07 17:02:12 +0530

**(श्रीमती जे.एस.ठाकरे)**

दिनांक :- ०७/०५/२०२६

२ रे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
वरूड